जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ०२ दिनांक - ०२/०१/२०२५**

# “सन २०२४ मध्ये पुणे पोलीस आयुक्तांकडून १०३ धोकादायक गुन्हेगार एमपीडीए कायद्यांतर्गत स्थानबध्द”

पुणे पोलीस आयुक्तालयातील विविध पोलीस ठाणेचे हद्दीमध्ये धोकादायक गुन्हेगारांमुळे सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झाली होती. तसेच त्यांच्यापासून जीविताचे व मालमत्तेचे नुकसान होईल या भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

पुणे पोलीस आयुक्तांनी धोकादायक गुन्हेगारांना एमपीडीए कायद्यांतर्गत स्थानबध्द करण्याचे कठोर धोरण राबविले. सन २०२४ मध्ये आयुक्तालयातील विविध पोलीस ठाणे हद्दीमध्ये खूनाचा प्रयत्न, खंडणी, गंभीर दुखापत, जबरी चोरी, वाहन तोड-फोड, रायट, बेकायदेशीर अग्निशस्त्रे, हत्यारे बाळगणे, गावठी हातभट्टी निर्मिती व विक्री अशा स्वरुपाचे गंभीर गुन्हे करुन दहशत निर्माण करणाऱ्या व सार्वजनिक सुव्यवस्था बाधित करणाऱ्या १०३ अट्टल गुन्हेगारांना पुणे पोलीस आयुक्तांनी नागपूर, चंदपूर, अकोला, अमरावती, कोल्हापूर, नाशिक अशा राज्यातील विविध कारागृहामध्ये १ वर्षाकरीता स्थानबध्द केले आहे. यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी अधिकाधिक कठोर व प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण पुणे पोलीसांकडून राबविण्यात येणार आहे.

श्री. अमितेश कुमार, पोलीस आयुक्त पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मोका एमपीडीए सेलचे अधिकारी व अंमलदार तसेच पोलीस ठाण्यातील सर्व्हेलंस पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी उपरोक्त उल्लेखनिय कामगिरी पार पाडली आहे.